# पुणे विद्यापीठ
सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ
**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**
एम.एस.सी., पी.एच.डी.
संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ


संदर्भ क्र.: विकमं/२०१२–१३/६९१ दिनांक : ०३/०२/२०१४.

प्रति,
**मा. प्राचार्य / मा. संचालक/ मा. विभागप्रमुख,**
पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.
पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग.

**विषयः– पुणे जिल्हास्तरीय विद्यार्थिंनी पदभ्रमण शिबिराबाबत.....**

महोदय/महोदया,

पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळाचे बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे ४१२ ४०८ यांचे संयुक्त विद्यमाने ०६ फेब्रुवारी ते ०८ फेब्रुवारी, २०१४ या कालावधीत 'पुणे जिल्हास्तरीय विद्यार्थिंनी पदभ्रमण' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/विद्यापीठांतील पदव्युत्तर विभागांतील **०२ विद्यार्थिंनींस गुरुवार, दि. ०६ फेब्रुवारी, २०१४ रोजी** आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळाचे बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे ४१२ ४०८ येथे वरील शिबिरासाठी उपस्थित राहणेबाबत सूचित करावे व सदर पत्र आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/विद्यापीठांतील पदव्युत्तर विभागाच्या सूचना फलकांवर प्रदर्शित करावे, ही विनंती.

कळावे,

**सोबत : महाविद्यालयाचे पत्र.**

विद्यार्थी कल्याण मंडळ पुणे-४११००७. पुणे विद्यापीठ

३/२/१४
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ


**विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, गणेश खिंड, पुणे – ४११ ००७.**
**☎ ०२० – २५६०११५४ फॅक्स : ०२० – २५६०११५४ मोबाईल : ९८५०१७६५७५**

॥ एकमेका सहाय्य करु । अवघे धरु सुपंथ ॥
आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित
# बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
(कला-वाणिज्य-विज्ञान-बी.सी.ए.-एम. ए.-एम.कॉम.-एम.सी.ए. कॉमर्स)
ता. आंबेगाव, जि. पुणे.
(आयडेंटिफिकेशन नंबर पी.यू./पी.एन./ए.सी./०७६/१९८९) (स्थापना १९८९)
कॉलेज कोड नंबर : १९६
NAAC Re - Accredited 'B' Grade
श्री. इंद्रजित भाऊराव जाधव
(M.A. M.Phil. Politics)
प्राचार्य
☎ : कार्यालय (०२१३३) २१९१८७/२४४२८२
निवास (०२१३३) २४४७१७
फॅक्स नं. (०२१३३) २४४२८२
E-mail:- bdkcollege_ghodegaon@Rediffmail.com
रौप्य महोत्सव वर्ष २०१३-१४

जा. क्र. ११३७/१४ दिनांक :- ३०/१/१४

विद्यार्थी कल्याण मंडळ
आवक/जावक क्र.:- 3549
दिनांक :- 30/1/14
शाखा :-

प्रति,
मा.प्राचार्य/विद्यार्थी कल्याण अधिकारी
पुणे जिल्हा अंतर्गत सर्व महाविद्यालय,
पुणे.

विषय– पुणे जिल्हास्तरीय विद्यार्थीनी पदभ्रमण शिबिरास विद्यार्थीनी पाठविणेबाबत.

महोदय,

पुणे विद्यापीठ , विद्यार्थी कल्याण मंडळ व आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित बी. डी.काळे महाविद्यालय घोडेगाव, ता. आंबेगाव जि.पुणे यांच्या संयुकत विद्यमाने गुरूवार दि.६/२/२०१४ ते शनिवार दि.८/२/२०१४ या कालावधीत पुणे जिल्हास्तरीय विद्यार्थीनी पदभ्रमण शिबिर **भिमाशंकर** येथे आयोजित करण्यात आले आहे.

सदर तीन दिवशीय पदभ्रमण शिबिरासाठी आपल्या महाविद्यालयातील दोन विद्यार्थीनींना भिमाशंकर येथे गुरूवार दि.६/२/२०१४ रोजी दु. १.३० वाजेपर्यंत आवश्य पाठवावे. शिबिराचा स्वागत कक्ष भिमाशंकर एस.टी.स्टॅडवर सकाळी १०.०० ते दु.४.३० पर्यंत असेल. या शिबिराचे उद्घाटन मा.डॉ.वासुदेव गाडे साहेब, कुलगुरू, पुणे विद्यापीठ पुणे यांच्या शुभहस्ते गुरूवार दि.६/२/२०१४ रोजी ठीक दु.२.३० वा. होणार आहे.

सहभागी विद्यार्थीनी प्रतिनिधींचा प्रवास खर्च महाविद्यालयाने करावयाचा असून भोजन व निवासाची व्यवस्था आयोजक महाविद्यालयातर्फे करण्यात आलेली आहे.

सहभागी विद्यार्थीनींची नावे **(bdkcollege_ghodegaon@rediffmail.com)** या ईमेलवर दि.४/२/२०१४ पर्यंत पाठविणे आवश्यक आहे.

कळावे,

आपले विश्वासू

(स्वाक्षरी)
विद्यार्थी कल्याण अधिकारी
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता.आंबेगाव जि.पुणे

(स्वाक्षरी)
प्राचार्य
बी.डी.काळे महाविद्यालय
घोडेगाव,ता.आंबेगाव जि.पुणे

टीप :–शिबिरात सहभागी होणा–या विद्यार्थीनींनी पदभ्रमणासाठी आवश्यक बूट, ट्रॅकसूट, सॅग, आवश्यक औषधे, पाण्याची बाटली, थंडीचे दिवस लक्षात घेवून अंथरूण, पांघरूण इ.वस्तू सोबत आणाव्यात.
संपर्कासाठी दूरध्वनी– प्रा.जोशी आर.एम. ९४२३२३३०४४, प्रा.थोरात बी.जी.–९९७५९८६५०७/७७०९६७१३९९
प्रा.बोऱ्हाडे एम.यू.– ९६८६८६९११०